


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे   अंक : ७०४ . वा   रविवार   दि. १० मार्च २०२४   पृष्ठ ८   किंमत ३रुपये

# भाजप मतदारांना हवा आहे भाजपचाच उमेदवार खा. प्रतापराव जाधव यांना नापंसत ?...

**जनसंचलन/बुलढाणा**

राजकारणात कधी काय होईल यांचा नेम आता राहिला नाही.कोणत्याही क्षणी काहीही होउ शकते हे मात्र खरं आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात भाजपचाच उमेदवार द्या अशी मागणी करणारा एक मॅसेज सोशल मिडीयावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यामुळे बुलढाणा लोकसभा मतदारसंघात नवीन वादळ आलेले आहे असे म्हणावे लागेल अर्थातच भाजप पदाधिकारी आणि सदस्यांच्या व्हॉट्स ग्रुपवर फिरणाऱ्या या मॅसेजच्या खाली विनित म्हणून बुलढाणा जिल्ह्यातील भाजप प्रेमी मतदार, लिहीलेले आहे. खा. प्रतापराव जाधव यांच्या कुण्या विरोधकाने ही पोस्ट तयार केली असावी, असा जरी अनुमान काढला तरी ती पोस्ट एका ग्रुपमधून अनेक ग्रुपमध्ये व्हायरल होत आहे. अर्थात व्हायरल करणारे भाजपचे कार्यकर्तेही प्रतापराव जाधव यांना कंटाळले की काय ? असा प्रश्न सुध्दा आता या ठिकाणी उपस्थित होत आहे. महायुतीकडून शिवसेनेचे प्रतापराव जाधव यांना पुन्हा उमेदवारी देण्याचे जवळपास पक्कचं झाले असल्याचे कळते. शिवसेना, धनुष्यबाण शिंदे गटाकडेच आहे. त्यातच राज्यातील खासदारांच्या नेतृत्वस्थानी असणाऱ्या नेत्यांपैकी प्रतापराव जाधव एक आहेत, त्यांनी खासदारकीची हॅटट्रीक केलेली आहे. सलग चौथ्यांदा विजयी झाले तर एक नवीनचं वातावरण निर्माण होईल हे माद्ध खरं आहे. प्रतापरावांची तयारी पूर्ण आहे. परंतु शिंदे गटाला तीन ते चार जागा कमी करून त्याजागी भाजप आपले उमेदवार देणार आणि ज्या जागी कमी होतील, त्यात बुलढाणा एक आहे, अशी दाट शक्यता राजकीय विश्लेषकांना वाटते. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यात आला आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात भाजपचाच उमेदवार द्या ज्यांचे विचार आपल्या प्रत्येक विचारांशी जुळले आहेत ज्यांनी सहकार क्षेत्रातून महाराष्ट्रासह जिल्ह्याला स्वार्थ न पहाता प्रत्येक क्षेत्रात नवी दिशा दिली आहे **हा मतदारसंघात भाजपचे नवखे उमेदवार सुखदेव काळे बहुमताने विजयी झाले होते.** हे लक्षात घ्यावे. हा मतदारसंघ भाजप बहुल मतदारांचाच आहे.तीन आमदार भाजपचे आहेत। बुथ नेटवर्क सुध्दा आहे. याउलट शिवसेना उमेदवार खा.जाधव कडे बुथ नेटवर्क नाही. सेनेत फुट पडल्या नंतर पन्नास टक्के च्यावर शिवसेना ही उबाठा पक्षात आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन बुलढाणा लोकसभा मतदारसंघात भाजपचाच उमेदवार निवडून येऊ शकतो। खा.जाधव हे केवळ भाजपच्या बळावर तीन वेळा खासदार झाले. परंतु त्यांनी कधीही युती मध्ये समन्वय, सामंजस्य, किंवा सहकार्याची भुमिका घेतली नाही. त्यामुळे भाजप मतदार, नेते, व कार्यकर्तामध्ये तीव्र नाराजी आहे. ही सर्व वस्तुस्थिती भाजपच्या अनेक बैठकांमध्ये मांडली आहे. म्हणून तीन वेळा निवडून आणले. पण आता मात्र मतदार राजा ऐकलच याची अजिबात खात्री नाही. मतदारांच्या सहनशीलतेलाही मर्यादा आहे . उमेदवार बदला नाहीतर भाजप अर्थात






पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रेमी मतदार मतदानाला जाऊन नोटाचा वापर करु शकतो. कारण.... मोदीजी ३५० + खासदार निवडून येणारच आहेत तर नापसंत आणि निष्क्रीय खासदार मोदींजींना बुलढाणा मधून कशाला पाठवायचा. हे लक्षात घ्यावे ही आग्रहाची नम्र विनंती. असा मॅसेज सोशल मिडीयावर फिरत आहे. वेळीच व्हा सावध .नाहीत व्हाल सावज. भाजपचाच कोणताही उमेदवार द्या. पुर्ण ताकदीने आणि प्रचंड मताने निवडून आणू याची शंभर टक्के खात्री। हमी देतो. भाजपच्या कोअर कमेटीने हा मतदारसंघ भाजप साठीच घ्यावा ही आग्रहाची जाहीर विनंती. विरोधी पक्षाकडे प्रबळ उमेदवार सुध्दा नाही. ही वस्तुस्थिती सुध्दा लक्षात घ्यावी. नकारात्मक मतदान झाले तर निर्णय वेगळा लागु शकतो.हे कृपया लक्षात घ्यावे ही नम्र विनंती.असे दिलेल्या मॅसेज नुसार आहे. प्रतापराव हे उमेदवारी जाहीर झाली की भाजपच्या बुथ नेटवर्क चा फायदा घेतात. गोड बोलतात. वापरून घेतात.नंतर पुढच्या निवडणुकी पर्यंत भाजप ला विचारात च नाही. जणू काही वापरुन फेकून देतात. अजूनही वेळ आहे. भाजप च्या मतदार आणि कार्यकर्ते मंडळींसाठी व जिल्ह्यात भाजप अधिक बळकट करण्यासाठी पक्षश्रेष्ठींनी धाडसी निर्णय घ्यावा.ही जाहीर विनंती. जरांगे पाटील यांच्या बहुचर्चित भूमिकेमुळे निर्माण झालेल्या जातीय संघर्षामुळे या मतदारसंघात उमेदवार विजयी होऊ शकतो.बुलडाणा लोकसभा उमेदवार असा हवा की **ज्याचे जिल्ह्यात जनसंपर्क दांडगा आहे ज्याचा परीचय जनसामान्यात असून तो उमेदवारा बद्दल कोणाची नाराजी नाही ज्याचे नेटवर्क पूर्ण जिल्ह्यात आहे** जो निवडून आल्यावर समाजाला एक नवी दिशा देऊ शकतो ज्याचे स्वप्न फक्त नि फक्त जिल्ह्याचा विकास जिल्ह्यात रोजगार,देऊन बेरोजगारी हद्दपार करू शकतो **असा उमेदवार सहकार क्षेत्रातील ज्यांची ख्याती आशिया खंडात परिचीत आहे. सुज्ञ नागरिकांना नाव तर कळालेच असेल** त्या बद्दल मतदार राजाचा कल जाणून घेतला असता लक्षात आलेली गंभीर वस्तुस्थिती जागरूक मतदार म्हणून नम्रपणे नमूद करित आहे. बुलढाणा जिल्ह्यातील भाजप प्रेमी मतदार. असा या मॅसेज मध्ये लिहिलेले आहे.ते सध्या सोशलमिडीयावर प्रंचड व्हायरल होत आहे.

# बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराला बिरसिंगपुर येथे सुरुवात....

**जनसंचलन/बुलडाणा**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राष्ट्रीयत्व निर्माण करण्यासाठी आणि व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर महत्वपुर्ण भूमिका बजावित असतांत असे प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ विजय नगरे यांनी व्यक्त केले संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संचालित बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन ७ मार्चला अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदे सदस्य प्राचार्य डॉ.विजय नागरे यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते . त्यांनी परिस्थिती ही माणसाला कशी घडवते याविषयी मार्गदर्शन केले या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ.अण्णासाहेब म्हळसणे होते .यांनी राष्ट्रीय सेवायोजनेचे मुख्य उद्दिष्ट सांगुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यात सहभागी होऊन समाज कार्य करण्याचं आवाहन केलं . याव-ळी सौ.वैशालीताई संजय शिंदे सरपंच बिरसिंगपूर श्री संजय शिंदे श्री दिनकर मुळे श्री अशोक किसनराव मुळे राजू मुळे गजानन कड राजू कांबळे वसंता राऊत प्रकाश शेळके प्रा. शेख युनिस शेख अहमद पठाण उपस्थित होते . कार्यक्रमाची सुरुव-ात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करून करण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.रिंढे यांनी तर सूत्रसंचालन कु. गायत्री गायकवाड हिने केले कार्यक्रमा दरम्यान महिला दिना निमित्य औचित्य साधून स्त्रीशक्तीचा जागर या विषयी विद्यार्थीनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी प्रा.डॉ.महेश यशवंत व्यवहारे प्रा.दीपक ननहई प्रा.किशोर बुलकडे प्रा. मुरलीधर जाधव प्रा. गुलाबराव सोनोने प्रा.दीपेश परमार प्रा.पुनम शिंबरे प्रा. डॉ.प्रेरणा पाटील प्रा.वसुधा घुमरे प्रा.शिल्पा इंगळे याच्यासह महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. हे शिबिर ७ मार्च ते १४ मार्च दरम्यान बिरसिंगपूर येथे होत आहे

# जिल्हा वार्षिक योजनेतून किमान कौशल्य विकास प्रशिक्षण...

## दिव्यांगाकरीता ४३ सक्षम राखीव प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा वार्षिक योजनेतून किमान कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात विविध कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. यावर्षी एकूण ८५० जागांवर प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यापैकी ४३ सक्षम दिव्यांगाकरीता राखीव ठेवण्यात आल्या आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. या प्रशिक्षण अभ्यासक्रमात आदर्श शिक्षण व क्रिडा बहुउद्देशीय संस्था, देऊळघाटतर्फे शिवणकला, फिल्ड टेक्निशियन होम अप्लायन्स, डाटा एन्ट्री ऑपरेटर, स्किल ट्रेनिंग सेंटर सिंदखेडराजा तर्फे मेकअप आर्टिस्ट, सोशल मीडिया एक्झिक्यूटिव्ह, टूर गाईड, गेस्ट सर्विस एक्झिक्यूटिव्ह, ऑरगॅनिक ग्रोवर, डेरी फार्मर, शिवणकला, शिवांश टेक्नीकल इन्स्टिट्यूट बुलढाणा तर्फे मशरूम ग्रोवर, धन्वंतरी बहुउद्देशीय संस्था, देऊळगाव राजातर्फेडाटा एन्ट्री ऑपरेटर, गेस्ट सर्विस एक्झिक्यूटिव्ह, स्वामी टेक्निकल इन्स्टिट्यूट शिक्षण केंद्र सिंदखेडराजातर्फे शिवणकला, गेस्ट सर्विस एक्झिक्युटिव्ह, ठाकरे स्किल डेव्हलपमेंट सेंटर नांदुरा तर्फे आयटी कॉर्डिनेटर, शिवणकाम, भालचंद्र महाराज कौशल्य विकास संस्था गोलखेड शेगावतर्फे डाटा एन्ट्री ऑपरेटर, ब्रॉडबॅंड टेक्निशियन हॅंडसेट आणि टॅब्लेट टेक्निशियन, शिवणकाम, स्व.दयासागरजी महाले कौशल्य विकास संस्था, उदयनगर तर्फे डाटा एन्ट्री ऑपरेटर आयटी कोऑर्डिनेटर ब्युटी थेरपिस्ट प्लंबर सोलर पॅनल टेक्निशियन, स्व. कुंडलीकराव शेरे टेक्नीकल इंस्टिट्युट दुसरबीड तर्फे मेडिकल सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह आयडी कॉर्डिनेटर हाउसकीपिंगचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विविध प्रशिक्षण देण्यात येत आहे. यात बुलढाणा येथे शिवणकाम डाटा एन्ट्री ऑपरेटर, मोताळा येथे



शिवणकाम, संग्रामपूर येथे डोमेस्टिक डाटा एन्ट्री ऑपरेटर, खामगांव येथे रुरल मिशन फिल्ड टेक्निशियन होम अप्लायन्सेस चिखली येथे डोमेस्टिक डाटा एन्ट्री ऑपरेटर, मॅन्युअल मेटल वेल्डिंग, शिल्ड मेटल वेल्डिंग, फिल्ड टेक्निशियन होम अप्लायन्सेस, देऊळगांव राजा येथे शिवणकाम, ब्युटी थेरपिस्टच्या कौशल्य प्रशिक्षणास प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा सक्षम दिव्यांगानी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# बुलडाणा येथे बुधवारी डाक अदालत...

**जनसंचलन /बुलडाणा**

बुलडाणा येथील डाक घर अधीक्षक कार्यालयात बुधवार, दि. १३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक व आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये अपरोक्षपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करून प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना, संभाष, पत्रव्यवहार किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार होते. या तक्रारींचा योग्यप्रकारे निवडा करण्यासाठी डाक अदालत घेण्यात येते. त्यात पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडवितात. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यांच्या आत तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास किंवा समाधानकारक उत्तर मिळाले नसल्यास अशा तक्रारींची डाक अदालतीमध्ये दखल घेण्यात येते. विशेषतः टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तु पार्सल, बचत बँक व मनीऑर्डर बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातात. यासाठी तक्रारींचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा. यात तारीख, ज्या अधिकार्यास मूळ तक्रार पाठविली असल्यास त्याचे नाव व हुद्दा याची माहिती देण्यात यावी. डाक सेवेबाबत तक्रार असल्यास गणेश आंभोरे, अधीक्षक डाक घर, बुलडाणा विभाग, बुलडाणा ४४३००१ यांच्या नावे दोन प्रती सह दि. ११ मार्च २०२४ पर्यंत पोहोचतील असे पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने महाशिवरात्री उत्साहात साजरी...

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा दिं ८-३-२०२४ गुरुवार रोजी महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सामाजिक व धार्मिक कार्यात सदा अग्रेसर रहाणारे मंडळाचे सर्वे सर्वा संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्ना भाऊ शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २४ वर्षा पासून अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम निस्वार्थ अखंडपणे सुरू आहेत सकाळी ९ वा ओंकारेश्वर मंदिर येथे सामुहिक अभिषेक करण्यात आला व भाविक भक्तांना शमी पत्र. बेल पत्र. धोत्रा चे फळाचे वाटप करण्यात आले रात्री ८ ते ११ श्री विर हनुमान मंदिरात भजन.११ ते १२ नामस्मरण, नंतर १२-३० वा सामुहिक अभिषेक करून ,पुजन.मंत्र जाप करून महाआरती करण्यात आली नंतर प्रसाद वाटुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली . या प्रसंगी सुदामभाऊ पाडोळे,शरदभाऊ सुकाळे,मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे.अरूण कडवकर,लालाजी सांगळे,अमर शर्मा, प्रेम शर्मा,शांताराम



चोपडे, नगरसेविका रेखा ताई जाधव,भागीरथी शेळके. सुशिला आवलकर. आशा अंधारे. मंगला बावस्कर. जया सुकाळे. शकुंतला ढवळे. संगिता देशमुख. जयश्री झापर्डे. बेबी आवलकर. गायत्री आवलकर. उज्वल सुकाळे.छकुली सुकाळे. अर्चना ढवळे. आरती सुकाळे,सिन्धु सुकाळे,अनिता पाडोळे, प्रिति पाडोळे,विद्या कापले,निर्मला मुळीक, रेखा मुळीक, शोभा जंगम, छाया नरोटे, सुलोचना फंड, चित्रा आवटे, सपना जाधव,संगिता तायडे,कल्याणी दुरूंदे, जयश्री आवटे,आशा दिपके, मनीषा पवार,वर्षा येळणे,रेखा गायकवाड ,यशोदा चव्हाण, स्वाति गायकवाड, अनिता बोन्द्रे,छाया शर्मा,उषा शर्मा,मानवी शर्मा. आराध्या ढवळे. मंगला सोळंके, त्रिवेणी अंधारे, छाया थोरात, जया थोरात, हेमा बोरा, व मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते मंडळाच्या वतीने वृक्षारोपण.रक्तदान. गोरगरीबांना भोजन वाटप.ब्लॅंकेट वाटप. पक्ष्यांच्या करीता पाणी पात्र वाटप असे अनेक उपक्रम वर्ष भर राबविल्या जातात अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# सामाजिक न्याय विभागाचे पुरस्कार जाहीर...




**जनसंचलन /बुलडाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात जिल्ह्यातील तीन संस्था आणि चार व्यक्तींचा समावेश आहे. सदर पुरस्कारांचे वितरण दि. ११ ते १४ मार्च या कालावधीत मुंबई येथे होणार आहे. सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या वर्षातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, शाहू-फुले-आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार व संत रविदास पुरस्कार जाहिर झाले आहेत. सदर पुरस्कारांमध्ये जिल्ह्यांतून सन २०२१-२२ च्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी निता हिवाळे, लता प्रमोद हिवाळे यांच्या पैनगंगा बहुद्देशिय शैक्षणिक संस्था, नांद्राकोळी, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिकासाठी निवृत्ती जाधव, उज्वला जाधव यांच्या संजिवनी बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक संस्था, केळवद, सन २०२०-२१ च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कारासाठी रमेश वानखेडे, गणेश वानखेडे यांच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बहुद्देशीय संस्था, सुंदरखेड यांची निवड करण्यात आली. सन २०२१-२२ च्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी अशोक तायडे, रा. म्हाडा कॉलनी, शेगाव, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कारासाठी सन २०१९-२० चा प्रताप निदाने, रा. वाल्मीकीनगर, खामगाव सन २०२०-२१ चा दामोधर बिडवे, रा. बुलडाणा, सन २०२१.२२ चा गणेश वानखेडे, रा. बुलडाणा यांचा समावेश आहे. पुरस्कार प्राप्त संस्था आणि व्यक्तींचे समाज कल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी स्वागत केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा युवा पुरस्काराकरीता प्रस्ताव आमंत्रित...

**जनसंचलन /बुलडाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे जिल्ह्यातील युवक, संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा, तसेच युवा विकासाचे कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. यासाठी परिपुर्ण प्रस्ताव दि. २८ मार्च २०२४ पर्यंत सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर पुरस्कार जिल्ह्यातील एक युवक, एक युवती व एक नोंदणीकृत संस्थांना देण्यात येतो. पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या जिल्ह्यातील युवक, युवती व संस्थांनी अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्रांसह, तसेच युवक-युवतीचे पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र व संस्थेसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्यांनी सर्व सदस्यांचे पोलिस चारित्र्य प्रमाणपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव दि. २८ मार्च २०२४ पर्यंत दोन प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करावा. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# नेहरु युवा केंद्राची जिल्हास्तरीय युवा संसद उत्साहात पडली पार...

**जनसंचलन /बुलडाणा**




नेहरु युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्याने जिल्हास्तरीय युवा संसद कार्यक्रम गुरुवारी, दि. ७ मार्च रोजी जिल्हा क्रीडा संकुलात पार पडला. मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी शरद पाटील, उपविभागीय पोलिस अधिक्षक सुधीर पाटील, नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास बाहेकर, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे, जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. मानकर उपस्थित होते. श्री. नरवाडे यांनी, युवकांसाठी स्मार्टफोन सायलंट किलर आहे. त्यामुळे याप-ासून अंतर ठेवावे. तसेच सुज्ञ नागरिक म्हणून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन केले. यावेळी डॉ.विकास बाहेकर आणि प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे यांची भाषणे झाली. जिजामाता महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अभिरुप युवा संसदेचे सादरीकरण केले. मतदार जागृतीबाबत शिवाजी काटे, आई रेणूका लोककला संच मेहकर व एएसपीएम आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. मतदार जागृती पोस्टरचे विमोचन करण्यात आले. युवा संसद भाषण स्पर्धेतील प्रथम श्रुती तायडे, व्दितीय ऋतुजा इंगळे यांना गौरविण्यात आले. जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी प्रास्ताविक केले. रणजितसिंग राजपूत यांनी सूत्रसंचालन केले. अजयसिंग राजपूत यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी धनंजय चाफेकर, विलास सोनोने, सुमित वाकोडे, देवानंद नागरे, उमेश बावस्कर, शीतल मुंढे, सुरज बोरसे यांनी पुढाकार घेतला.

# महिला दिनी लेक लाडकी अभियानाचा शुभारंभ...

**जनसंचलन /बुलडाणा**



जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण विभागातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त लेक लाडकी योजनेचा शुभारंभ करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी, विशाल नरवाडे यांच्या हस्ते फीत कापून अभियानाची सुरुवात करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद ऐंडोले, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. पिंपळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात लेक लाडकी योजनेच्या बॅनरचे श्री. नरवाडे यांचे हस्ते फीत कापून शुभारंभ करण्यात आले. तसेच महिलांच्या मोटर सायकल रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. ही रॅली जिल्हा परिषदेच्या गेट पासून सुरुवात होऊन जय स्तंभ चौक, कारंजा चौक, भोडे चौक, तहसिल कार्यालय, संगम चौक, जय स्तंभ चौक या मार्गाने निघून परत जिल्हा परिषद येथे रॅलीची सांगता झाली. रॅलीमध्ये लेक लाडकी योजनेची प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांनी फलकातून संदेश दिला.

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा...

**जनसंचलन /बुलडाणा**




राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा. या कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या स्वराज्य स्थापन करण्यामागील प्रेरणा असणाऱ्या माता जिजाऊ, स्वातंत्र्याची चेतना देणाऱ्या राणी लक्ष्मीबाई आणि स्त्री शिक्षणासाठी झटणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सर्व स्त्रियांच्या कार्याला वंदन करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रास्तावनेत प्रा. नेहा देशमुख ह्यांनी सांगितले की दरव-र्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन अर्थात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येक महिलेसाठी सन्मानाचा, अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. इतिहासात डोकावलात तर मार्च १९८० मध्ये न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो महिला कामगारांनी रूटगर्स चौकात जमून ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता या मागण्या केल्या. नंतर १९१० मध्ये कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या आंदोलनाच्या स्मरणार्थ हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून स्वीकारण्याचा ठराव झाला. यानंतर दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन अर्थात आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे सर्वात मोठे उद्दिष्ट म्हणजे महिला आणि पुरुषांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी जागरूकता आणणे, तसेच महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे हा आहे असे प्रा. किरण सरोदे ह्यांनी सांगितले. प्रा. सौ. पल्लवी राणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात महिलांसाठी तथा विद्यार्थींनी साठी नेहमीच सुरक्षिततेचे वातावरण असते. तसेच महाविद्यालयात कुठल्याही प्रकारचा स्त्री पुरुष भेदभाव करण्यात येत नाही. येथे सर्वांसाठी समान संधी उपलब्ध असतात, संस्था नेहमीच महिला व मुलींच्या प्रगतीसाठी विवीध योजना राबवित असते, यासाठी त्यांनी द्वारका फाउंडेशनचे अध्यक्ष मा. श्री. धृपदरावजी सावळे साहेब तथा संस्थेच्या संचालिका मा. ॲडव्होकेट सौ. किर्तीताई पऱ्हाड मॅडम यांचे आभार मानले. तसेच संस्थेत उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक संधीचा सभोवतालच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे प्रतिपादन पालक वर्गासाठी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. बी. व्ही. नरवाडे, प्रा. पी. एस. काटकर, प्रा. प्रवीण राणे, प्रा. एन. एस. पायघन, प्रा. पंकज राणे, प्रा. एम. एम. खान, प्रा. ए. जि. कुहिरे, प्रा. एच. एस. देशपांडे, प्रा. एस. आर. सोनोने, प्रा. आर. बी. चोपडे , प्रा . एम. ई. सुरडकर , प्रा. आर. व्ही. भालेराव, प्रा. वैष्णवी चौधरी , प्रा. पल्लवी पट्टे , कु. अदिती रिंढे , श्री जि टी. शिरसाट,श्री विशाल शिंदे, श्री उत्तम पुराणे, योगेश काकडे, भूषण चीटवार, केलास लडके, तसेच सर्व विभागप्रमुख , शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हा युवा पुरस्काराकरीता प्रस्ताव आमंत्रित

**जनसंचलन /बुलडाणा**



क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे जिल्ह्यातील युवक, संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा, तसेच युवा विकासाचे कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. यासाठी परिपुर्ण प्रस्ताव दि. २८ मार्च २०२४ पर्यंत सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर पुरस्कार जिल्ह्यातील एक युवक, एक युवती व एक नोंदणीकृत संस्थांना देण्यात येतो. पात्रतेचे निकष पुर्ण करणाऱ्या जिल्ह्यातील युवक, युवती व संस्थांनी अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्रांसह, तसेच युवक-युवतीचे पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र व संस्थेसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्यांनी सर्व सदस्यांचे पोलिस चारित्र्य प्रमाणपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव दि. २८ मार्च २०२४ पर्यंत दोन प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करावा. याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# बुलढाण्यातील ऐतिहासिक धम्म परिषदेची सुवर्णाक्षरांनी नोंद...

## बुद्धांच्या धम्मानेच जगाचे कल्याण भन्ते ज्ञानज्योती महाथेरो यांचा उपदेश धम्मदेसनेला विराट गर्दी...

## बुद्ध अनुयायांनी सहा तास शांतचित्ताने ऐकले प्रवचन...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्याच्या इतिहासात शनिवार, ९ मार्चला पार पडलेल्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेची ऐतिहासिक आणि अभूतपूर्व अशी नोंद सुवर्णाक्षरांनी लिहिल्या गेली. ही परिषद प्रबुद्ध भारत निर्माणाच्या धम्म क्रांतीची ज्योत पेटवणारी ठरली. तथागत गौतम बुद्धांच्या धम्मानेच जगाचे कल्याण होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धमय भारत निर्माण करण्यासाठी जी चळवळ उभी केली होती, त्या धम्म चळवळीला बळकटी देण्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन जागतिक कीर्तीचे बौद्ध धम्मगुरु भन्ते ज्ञानज्योती महाथेरो यांनी आपल्या धम्मप्रवचनात केले. वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा मूकनायक फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सतीश पवार यांच्या विशेष पुढाकारातून, मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाभरातील धम्मबांधवांच्या सहकार्याने ही परिषद यशस्वी झाली. हजारोंच्या संख्येने धम्मबांधवांनी सहभाग नोंदवून बुद्धमय भारत घडविण्याचा निर्धार केला. सकाळी साडेदहा वाजेपासून सुरू झालेली परिषद सायंकाळी साडेसहा वाजेपर्यंत चालली. भिक्खूंचे धम्मप्रवचन तब्बल सहा तास चालले, ते बुद्ध अनुयायांनी शांतचित्ताने ऐकले. जागतिक कीर्तीचे धम्मगुरु, बुद्ध तत्वज्ञानाचे अभ्यासक, संशोधक, तथागतांच्या मानवतावादी जागतिक कल्याणाचा, प्रज्ञा, शील, मैत्रीचा संदेश आपल्या पांडित्यपूर्ण आणि करुणामय वाणीने जगभर प्रचार, प्रसार करणारे भन्ते ज्ञानज्योती महाथेरो हे धम्म परिषदेचे खास आकर्षण होते. सोबतच श्रीलंकेहून आलेले भन्ते शांतचित्त थेरो, भन्ते यश, भन्ते गुणानंद, भन्ते पुत्र यांची प्रमुख उपस्थिती होती. धम्म परिषदेच्या स्थळावर भिक्खू संघाचे आगमन होताच धम्म भगिनींनी त्यांच्याचरणी फुलांची उधळण करून भन्तेजींचे स्वागत केले. सकाळी साडेदहा वाजता भन्ते ज्ञानज्योती महाथेरो यांच्या हस्ते धम्मध्वजारोहण करण्यात आले. धम्मपीठावर विराजमान झाल्यानंतर भन्ते ज्ञानज्योती महाथेरो यांनी पंचशील व बुद्धवंदना दिली. भन्ते पुत्र, भन्ते गुणानंद, भन्ते यश, भन्ते शांतचित्त थेरो यांनी आपल्या धम्मवाणीतून बौद्ध धर्म, बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन, मैत्री याविषयी धम्मदेसना दिली. आपल्या प्रवचनात भन्ते ज्ञानज्योती म्हणाले, बुद्ध धम्म म्हणजे क्रांती होय. धम्म म्हणजे निती. धम्म कुठलाच धर्म नसतो. तो सत्य, शुद्ध असतो. आर्य सत्याचा साक्षात्कार माणूस घडवतो. राजकीय लोकशाही ही सामाजिक, आर्थिक लोकशाही व सांस्कृतिक लोकशाहीमध्ये बदलण्यासाठी बाबासाहेबांनी रिपब्लिकन ऑफ इंडिया, बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल या संघटना यासाठी दिल्या होत्या. मात्र, आज त्यांची काय अवस्था करून ठेवली, हे सर्वांना दिसते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समता निर्माण करून खऱ्या अर्थाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या मानवी मूल्यांवर आधारित जीवन पद्धतीच्या लोकशाहीची सध्या गरज आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या चार संघटनांना पुनरुज्जीवत करण्याच्या कामाला लागा, असे आवाहन ज्ञानज्योती यांनी यावेळी केले. भिक्खू संघाशिवाय धम्म चळवळ पुढे सरकणार नाही. त्यांच्या सहभागानेच मूळ बुद्धवाणी संपूर्ण जगात जशीच्या तशीच जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. भिक्खू संघाने महापरित्राणपाठ, पुण्यानुमोदन केल्यानंतर परिषदेचा यशस्वी समारोप झाला. परिषदेचे मुख्य आयोजक सतीश पवार यांच्यासह संभाजीनगर येथील ज्येष्ठ समाजसेवक भीमराव मुगदल, बालाभाऊ राऊत, अर्जून खरात, ॲड. कैलास कदम, सुरेश जाधव, अनिल पारवे, प्रा. किरण पवार, अजय पडघान, चंद्रशेखर धंदरे, साहेबराव पारवे, निरंजन जाधव, राहुल वानखेडे, आय.टी. इंगळे, के.पी. इंगळे, अशोक हिवाळे, कमलाकर काकडे, सतीश गुरचवळे, अनंता मिसाळ, एस.एस. सुरडकर, समाधान पवार, संतोष कदम, लक्ष्मण साळवे, उद्धव वाकोडे, डॉ. राहुल दाभाडे, गौतम गवई, प्रभाकर जाधव, द्वारकाबाई इंगळे, संदीप मोरे यांच्यासह धम्मबांधवांनी धम्म परिषद यशस्वी होण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. मलकापूर रोडवरील बुद्ध, फुले आणि बाबासाहेब यांच्या तीन पुतळ्यापासून ते धम्म परिषदेपर्यंत काढण्यात आलेली चारचाकी वाहनांची रॅली लक्षवेधी ठरली. जागतिक कीर्तीचे बौद्ध धम्मगुरु पूज्य भन्ते ज्ञानज्योती महाथेरो यांच्यासह श्रीलंकेहून आलेल्या भिक्खू संघातील भन्तेंना फुलांनी सजविलेल्या दोन जिप्सी वाहनात विराजमान करण्यात आले. पुढे तथागत गौतम बुद्धांची मूर्ती असलेले वाहन व त्या मागे भन्ते आणि धम्मबांधवांची वाहने शिस्तीत एका मागोमाग निघाली. ऐतिहासिक ठरलेल्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेत जिल्ह्यातील सातरत्नांचा मुख्य आयोजक सतीश पवार यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन मूकनायक बुलढाणा या पुरस्काराने गौरविण्यात आले. गृहमंत्रालयाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, पुणे येथील उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारे, ज्येष्ठ साहित्यिक नारायणराव जाधव येळगावकर, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. पंजाब हिरे, सैनिकी क्षेत्रातील कमांडट कॅप्टन मोनिका साळवे, उद्योजक डॉ. अर्चित हिवाळे आणि सामाजिक सेवेबद्दल लक्ष्मण साळवे हे सातरत्न या पुरस्काराचे मानकरी ठरले.



# जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलून टाकणार- संदीप शेळके

**जनसंचलन/ खामगाव**

जिल्हा विकासात नंबर एक असला पाहिजे, या हेतूने वन बुलडाणा मिशन यशस्वीरित्या वाटचाल करीत आहे. परिवर्तन रथयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. हे लक्षात घेता जनतेने खासदारकीची संधी दिल्यास विकासाद्वारे जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलून टाकणार, असे प्रतिपादन वन बुलढाणा मिशनचे संकल्पक तथा राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी केले. खामगाव तालुक्यात सुरु असलेल्या परिवर्तन रथयात्रेदरम्यान ९ मार्च रोजी माटरगाव येथे ते बोलत होते. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, जिल्ह्यात प्रस्थापित राजकारण्यांनी सत्तेसाठी राजकारणच केले. तो त्यांचा पिंड आहे. परंतु सर्वांगीण विकासाची संकल्पना कोणाच्याही मनात कशी आली नाही? असा घणाघाती सवाल त्यांनी उपस्थित केला. जिल्हा विकासाच्या बाबतीत नंबर एक असला पाहिजे या हेतूने वन बुलडाणा मिशन ही राजकीय चळवळ मार्गक्रमण करत आहे. खामगाव तालुक्यात जनतेचा मोठा प्रतिसाद पाहयला मिळाला. भारताच्या चांद्रयान या अभिमानास्पद व यशस्वी मोहीमेत खामगाव येथील चांदीचा महत्वपूर्ण वाटा आहे. असा उल्लेख आवर्जून करत संदीप शेळके म्हणाले, बुलढाणा जिल्हा कर्तुत्ववान, कर्तबगार व्यक्तींचा जिल्हा आहे. तसेच जगविख्यात लोणार सरोवर, संतनगरी शेगाव, मातृतीर्थ सिंदखेडराजा अशी महत्वाची ठिकाणे असताना सुद्धा इथला तरुण सतत रोजगाराच्या चिंतेत दिसतो. आपण राजर्षी शाहू परिवाराच्या माध्यमातून आतापर्यंत १५०० तरुणांना रोजगार आणि स्वत:च्या पायावर उभे राहणाऱ्या १० हजार युवकांना आर्थिक सहाय्य देण्याचे काम केले आहे. शिवाय ४० हजार महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न आपण आपल्या परीने केला. मात्र जिल्ह्याच्या विकासासाठी विचार करत असताना, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे इथला शेतकरी सतत संकटात असतो, त्यांच्या वेदना , समस्या सोडवण्यासाठी तसेच तरुणांसाठी शाश्वत रोजगार देण्यासाठी आपण भूमिका घ्यायला हवी. म्हणूनच लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्धार केला. त्यामुळे जनतेने संधी दिली तर आपण जिल्ह्याचा चेहरा मोहराच बदलून टाकणार असा शब्द संदीप शेळके यांनी दिला. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी, शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी गेलं तर निश्चितच या सर्व चिंता संपुष्टात येऊन बुलढाणा जिल्हा विकासाच्या आभाळात गगनभरारी घेईल,असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.तिहासिक, भौगोलिक आणि अध्यात्मिक दृष्ट्या वैभव प्राप्त असलेल्या बुलडाणा जिल्हाला आजही मागासलेपणा कलंक कायम आहे. ही अत्यंत मोठी शोकांतिका आहे. गौरवशाली वारसा असताना जिल्ह्याच्या विकासासाठी आजवर प्रस्थापित राजकारण्यांनी कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. परिणामी जिल्ह्याचा विकास खुंटला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राजकारणात येणे आवश्यक आहे. मी करिअर म्हणून राजकारणात आलो नाही. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर राजकारणात आल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी भूमिका संदीप शेळके यांनी व्यक्त केली.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958